चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२२ एप्रिल, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

## एका आरोपीसह चोरी गेलेल्या ०३ दुचाकी जप्त

दिनांक १६/०४/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चंद्रपुर शहर परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम होन्डा स्टनर मोटारसायकल क्र. एमएच एए १७४४ हा संशयास्पद नंबर टाकुन फिरत आहे. अशी माहिती मिळताच स्थागुशा पथक बागला चौक येथे पोहचले असता मिळालेल्या माहितीप्रमाणे वरील नंबरची मोटारसायकल दिसुन आली. सदर दुचाकीस्वार इसमास त्या वाहनाबाबत विचारपुस केली असता, त्याने ती मोटारसायकल ही सिव्हील लाईन चंद्रपुर येथुन चोरी केल्याचे सांगीतले. आणि त्याच्या नंबर एमएच ४३ एए २८४४ हा असुन तो बनावटी नंबरचा वापर करीत असल्याचे निष्पन्न झाले. यावरून आरोपी नामे **सुनिल लक्ष्मण मडावी वय १९, रा. महाविरनगर भिवापुर वार्ड चंद्रपुर** यास अटक करून विचारपुस केली असता, त्याने वेगवेगळया ठिकाणाहुन आणखी मोटारसायकल चोरीकेल्याची कबुली दिली.

सदर आरोपी कडुन जप्त केलेल्या दुचाकीबाबत पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. १०६१/२०१८ कलम ३७९ भादंवि चा गुन्हा नोंद आहे. तसेच चंद्रपुर शहर येथील दोन गुन्हयातील दोन मोटारसायकल जप्त करण्यात आल्या असुन तपासादरम्यान सदर आरोपीकडुन आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात, स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे, यांचे नेतृत्वात सफौ. दौलत चालखुरे, पद्माकर भोयर, पोहवा महेंद्र भुजाडे, पोशि कुंदलसिंग बावरी, प्रफुल यांनी पार पाडली.

---

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२२ एप्रिल, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# अवैध दारू बाळगणाऱ्या आरोपीस ०३ वर्ष सश्रम कारावास व २५ हजार रू दंडाची शिक्षा

पोलीस स्टेशन चिमुर अंतर्गत नेहरू चौक येथे दुकानात विक्रीकरीता दारू बाळगणाऱ्या आरोपीस २२/०४/२०१९ रोजी **श्री. छल्लानी, न्यायदंडाधिकारी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

दिनांक २८/१०/२०१६ रोजी पोलीस स्टेशन चिमुर प्रभारी पोनि. श्री. दिनेश लबडे, आणि पोस्टे पथक यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून **आरोपी नामे बंडु श्रीहरी बोरनवार वय ४५ वर्ष, रा. इंदीरा नगर चिमुर,** याच्या नेहरू चौक येथील नास्ता सेंटर येथे छापा टाकला असता आरोपीने आपल्या दुकानात अवैध रित्या विक्री करीता दारू बाळगुन ठेवलेली असल्याचे मिळुन आल्याने सदरचा माल आणि आरोपीस ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन चिमुर येथे अप.क्र. ३९७/२०१६ कलम ६५ ई मुदाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोहवा. कविश्वर पुरके, पोस्टे चिमुर यांनी पुर्ण करून आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक २२/०४/२०१९ रोजी **आरोपी नामे बंडु श्रीहरी बोरनवार वय ४५ वर्ष, रा. इंदीरा नगर चिमुर, यास सीआरपीसी कलम २५५(२) अन्वये कलम ६५ ई मुंबई दारूबंदी कायदा अन्वये ०३ वर्ष सश्रम कारावास आणि २५,०००/—रू दंड, न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा श्री. छलानी, न्यायदंडाधिकारी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. संजय आर. ठावरी, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** यांनी काम पाहीले असुन कोर्ट पैरवी म्हणुन **पोना. बलदेव कुमरे, पोस्टे. चिमुर,** यांनी काम पाहिले.

———————————————————————————————